# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 03 October 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०३ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

हैदराबाद क्रिकेट असोसिएशनमध्ये अध्यक्षपदाच्या कार्यकाळात आर्थिक गैरव्यवहार केल्या प्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने माजी क्रिकेटपटू मोहम्मद अझहरुद्दीन यांच्या विरोधात समन्स जारी केलं आहे. हैदराबादच्या उप्पल इथल्या राजीव गांधी क्रिकेट मैदानासाठी डिझेल जनरेटर, अग्निशामक यंत्रणा आणि छत यांच्या खरेदीत २० कोटी रुपयांचा कथित गैरव्यवहार केल्याच्या प्रकरणावरुन हे समन्स जारी करण्यात आलं आहे.

****

शारदीय नवरात्रोत्सवाला आजपासून प्रारंभ झाला असून, सर्वत्र भक्तिमय वातावरणात देवीची आराधना केली जात आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसात देवीची नऊ रुपांमध्ये पूजा केली जाते. सजावटीसह लागणारं साहित्य, मातीचे घट, झेंडूची फुलं यांच्या खरेदीसाठी सर्व बाजारपेठांमध्ये गर्दी दिसून येत आहे.

कोल्हापूर इथल्या करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीच्या मंदिरात आज सकाळी घटस्थापना करण्यात आली. धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर इथल्या श्री तुळजाभवानी मातेच्या मंदीरात घटस्थापना होत आहे, तत्पूर्वी आज पहाटे देवीची मंचकी निद्रा संपून सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली. या नवरात्र महोत्सवात विविध अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहेत.

साडेतीन शक्तीपीठांपैकी अर्धपीठ असलेल्या वणी इथल्या श्री सप्तशृंगी देवीची आज पहाटे महापूजा करण्यात आली आणि नवरात्र उत्सवाचा आरंभ झाला.

श्री क्षेत्र माहूर इथं देशभरातील भाविक नवरात्रात दर्शनासाठी येतात. देवीला विविध नऊ रंगाचं पैठणी महावस्त्र घालण्यात येतं. नवरात्रोत्सव कालावधीत ११० बस वाहतूक सेवेसाठी उपलब्ध राहणार असून, तीन आरोग्य पथकंही नियुक्त करण्यात आले आहेत.

धुळे शहरातली प्रसिद्ध खान्देश कुलस्वामिनी आदिशक्ती एकविरा माता मंदिरात देखील नवरात्रोत्सवाला सुरुवात झाली असून, खासदार डॉ. शोभा बच्छाव यांच्या हस्ते आज पहिली आरती करण्यात आली.
रत्नागिरी जिल्ह्यात रत्नदुर्ग किल्ल्यावरची श्री भगवती देवी, आडिवऱ्याची महाकाली, दाभोळची चंडिका देवी, चिपळूणची विंध्यवासिनी अशा पुरातन मंदिरांसह जिल्ह्यातल्या देवीच्या अन्य मंदिरांमध्ये नवरात्रौत्सवानिमित्त विविध कार्यक्रम होत आहेत. जिल्ह्यात ४८७ ठिकाणी देवीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाणार असून, त्यामध्ये ४२५ सार्वजनिक नवरात्रौत्सवांचा समावेश असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.
छत्रपती संभाजीनगरात कर्णपुरा इथल्या तुळजाभवानी देवीच्या यात्रेला आजपासून सुरवात झाली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी काल या स्थळाची पाहणी करून भाविकांसाठी केलेल्या सुविधा तसंच उपाययोजनांचा आढावा घेतला.

****

दरम्यान, कर्णपुरा देविच्या यात्रेत भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता त्या परिरातले काही वाहतूक मार्ग बंद करण्यात आले आहेत. लोखंडी पुल ते पंचवटी चौक जाणारा आणि येणारा मार्ग, कोकणवाडी चौक ते पंचवटी चौकाकडे जाणारा आणि येणारा रस्ता, महावीर चौक ते पंचवटी चौक उड्डाणपुलाखालील दोन्ही बाजूचा रस्ता आणि रेल्वेस्थानक ते पंचवटी चौकाकडे पुलाखालून जाणार रस्ता बंद करण्यात आला आहे. नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असं अवाहन पोलिसांनी केलं आहे.

****

जळगाव इथं अखिल भारतीय अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या वतीने 'संविधान बचाओ, महाराष्ट्र बचाओ' या विषयावर अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष श्याम मानव यांचं व्याख्यान झालं. भारतात सामाजिक एकोपा नसल्याचा फायदा घेत इंग्रजांनी आपल्यावर दोनशे वर्ष राज्य केलं, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील जातीयता मिटवून सर्वसमावेशक संविधानाची निर्मिती केली, असं ते यावेळी म्हणाले.

****

नांदेड जिल्ह्यात किनवट तालुक्यातल्या शिवणी बामणी, डोंगरगाव शिवारात पोलिसांनी दोन दिवस कारवाई करत सव्वा नऊ क्विंटल गांजा जप्त केला. दोन ठिकाणी केलेल्या या कारवाईत ४६ लाख २२ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

केला असून, सात जणांविरुद्ध अंमली पदार्थ कायद्यान्वये किनवट ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

सोलापूर – मंगळवेढा राष्ट्रीय महामार्गावर कामती इथं एक पिकअप व्हॅन रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात पलटी होऊन झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. तुळजापूरहून मंगळवेढा तालुक्यातल्या गोणेवाडी इथं देवी ची ज्योत घेवून जात असताना आज सकाळी हा अपघात झाला.

****

महिलांच्या आयसीसी टी–ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेला आजपासून शारजा इथं सुरुवात होत आहे. बांग्लादेश आणि प्रथमच खेळणारा स्कॉटलंड यांच्या उद्घाटनाचा सामना होईल. भारताचा पहिला सामना उद्या न्यूझीलंडसोबत होणार आहे. येत्या २० तारखेपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत दहा संघ उतरले आहेत. ऑस्ट्रेलियाच्या महिलांनी या स्पर्धेत मागील तिनही वेळा विजेतेपद मिळवलं असून, भारतीय संघाला अद्याप एकदाही विजेतेपद मिळालेलं नाही. मुख्य स्पर्धेपूर्वी झालेल्या सराव सामन्यांमध्ये भारतीय महिलांनी दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीज यांना पराभूत केलं आहे.

****

खो –खो या देशी खेळाची पहिली विश्वचषक स्पर्धा पुढच्या वर्षी भारतात होईल, असं भारतीय खो– खो महासंघ आणि आंतरराष्ट्रीय खो– खो महासंघानं जाहीर केलं आहे.

****